# आनंददायी की आनंदमय

अलीकडे शिक्षण हे आनंददायी असावे असे म्हणण्याची एक फॅशनच झाली आहे. सरकार म्हणू लागले आहे की. शिक्षण हे आनंददायी असले पाहिजे. म्हणून सगळे सरकारी शिक्षण-कर्मचारी म्हणतात की शिक्षण हे आनंददायी असले पाहिजे. सरकारी कर्मचारी सांगतात म्हणून शिक्षकही शिक्षण आनंददायी असेल पाहिजे असे म्हणू लागले आहेत. म्हणोत बिचारे ! म्हणोत आणि तसे करोतही !

मी विचार करतो तेव्हा मला 'आनंददायी' हा शब्द रुचत नाही. शिक्षण आनंददायी असावे, असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा नकळतपणे आपण शिक्षणाचे दोन प्रकार मानतो. एक, आनंद देणारे शिक्षण-आनंददायी शिक्षण आणि दोन, आनंद न देणारे शिक्षण. खरेच, असे दोन प्रकार आहेत का याच्यावर विचार करायला हवा. पण तूर्तास् आपण हे दोन प्रकार आहेत असे ग्राह्य मानूया.

मग प्रश्न असा निर्माण होतो की, शिक्षण आनंददायी असावे, असे हे सारे लोक का म्हणतात ? म्हणजेच त्यांना असे म्हणायचे आहे का की. शिक्षण हे आज आनंददायी नाही, आणि ते तर आनंददायी असायला हवे. तसे असेल तर पुढचा प्रश्न उद्भवतो. शिक्षण जर आनंददायी नसेल तर ते आपण सक्तीने मुलांवर का लादतो? मुलांनी आनंदी असावे असे आपल्याला वाटत नाही का? मग मुलांना शाळेत का घालतो ? शिकवणीच्या वर्गातून का अडकवतो? गृहपाठाच्या जोखडात का जखडतो? त्यांना ज्यात आनंद मिळतो ते आपण त्यांना का करू देत नाही? की त्यांना कशात आनंद होतो हेच आपल्याला, अगदी सार्वत्रिकरित्या, माहीत नाही?

सरकारला वाटते मुलांना गाणी म्हणायला सांगीतली की शिक्षण आनंददायी होईल, नाचायला सांगितले, शाळेत पहिल्या दिवशी त्यांना ओवाळले, त्यांच्या हातात फूल ठेवले, शाळेत स्वागताच्या पताका लावल्या, रांगोळ्या काढल्या, मुलांच्या स्वागतासाठी सारे शिक्षक दारात उभे राहिले की पुढे वर्षभर शिक्षण आनंदमय होईल. सरकारला असे वाटते म्हणजेच सरकारी शिक्षण-कर्मचाऱ्यांना असेच वाटते. त्यांना वाटते म्हणून शिक्षकांनाही अगदी तसेच वाटते. त्यांना तसे वाटते म्हणून शाळा-शाळांतून तसे केले जाते. पण दुसऱ्या दिवसापासून शिक्षण आनंददायी झाल्याचे काही कुणाला जाणवले नाही. मग अशा वेगवेगळ्या उपायांतून आनंदी नसलेले शिक्षण आनंददायी करण्याचा, या तमाम मंडळींचा प्रयत्न फसतोय की काय !

मला असे वाटते की. मूळ 'शिक्षण' हा शब्द आपण नीटपणे समजावून घेतला तर त्याला 'आनंददायी' असे खास विशेषण लावण्याची गरज आपल्याला भासणार नाही.

शिक्षण ही काही एखादी वस्तू नव्हे की तिला आनंदाचा रंग चढवून ती मुलांच्या हातांमध्ये द्यावी. शिक्षण ही एक वाहती प्रक्रिया आहे. आणि मुलांना जेव्हा त्यात पोहोण्याची संधी मिळते तेव्हा ही प्रक्रिया मुलांना आनंदाचीच असते. मग मुले गाणे म्हणोत की गणित करोत. नवे नवे शिकत जाणे ही प्रक्रियाच मुळी मुलांना आव्हाने निर्माण करीत जाते, आनंदी करीत जाते. मुलांच्या बाबतीत शिकणे ही नैसर्गिक प्रक्रिया असते. त्याची प्रेरणा उपजत असते. त्यासाठी लागणारी ऊर्जाही उपजतच असते. त्यासाठी लागणारे स्वातंत्र्य मुले आपले

आपण घेतच असतात. ही ही त्यांची नैसर्गिक प्रवृत्तीच असते. कारण, मुक्त मनाच्या अवस्थेतच शिकणे शक्य असते.

अशाप्रकारे, मुक्त मनाने शिकण्याच्या आनंदगर्भ अवस्थेत, मुलांना शिकू न देता त्यांना जाणूनबुजून शिकविण्याचा घाट घातला की मग, मुलांच्या आनंदप्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. त्या शिकविण्याला सक्तीचे नि शिस्तीचे कोंदण घातले की मुले त्या नैसर्गिक आनंदापासून खूपच दूर जातात. म्हणजे, मुळात शिक्षण ही एक आनंदप्रक्रियाच असते, आपण तिला दूर हटवतो आणि मग शिक्षण आनंददायी करण्याचा खटाटोप करू लागतो. हे आपण असे करतो कारण, मुळातच आपण शब्दयोजनाच योग्य करत नाही. शिक्षणाला 'आनंददायी' बनवायचे ठरवले की सारा घोटाळा होऊ लागतो. आपण शब्दरूप बदलू या, आपण 'आनंदमय शिक्षण' असे म्हणू या. म्हणजे, शिक्षण आनंदमयच असते हे स्वीकारू या. ते तसेच कसे राखता येईल याचा विचार करू या! शिक्षणपद्धती अशा रितीने बदलू या की शिक्षणाचे आनंदमय रूप टिकून राहील, मुले आनंदाने शाळांतून जातील, शिक्षकांनाही शाळेत जाण्याचा आनंद घेता येईल !

❖